ARTHA.
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53.
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १७ | पुणें, बुधवार तारीख ७ मार्च, १९५१ | अंक १०

## भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

मुख्य कचेरीः—भोर, जि. पुणें.

शाखाः—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ६९,६०० |

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. व्यं. शिंमरे, अध्यक्ष.
न. मू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. कृ. खोले.
श्री. चं. रा. राठी.
श्री. के. वि. केळकर, एम्. ए., एलएल. बी.
श्री. बा. ग. धंद्रुके.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.
बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.
दराबाबत समक्ष चौकशी करावी
पुणें कचेरीः—बुधवार घ. नं. ३६१-६२, पासोड्या विठोबानजिक. फोन नं. २५७६.
आधिक माहितीसाठी लिहा.
रा. गो. आगाशे, बी. ए. ( ऑ. )
मॅनेजर.

फोनः ३४५१९ तारः SAHYOG

## दि प्रॉव्हिन्शिअल इंडस्ट्रिअल को-ऑपरेटिव्ह असोसिएशन, लि.

९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई १.

उत्पादकांच्या ( प्रोड्यूसर्स ) सोसायट्यांना असोसिएशन खालील मालाचा पुरवठा करतेः—

सूत, रसायनें, रंग, कच्ची कातडीं व चामडीं, कातडीं कमाविण्यास लागणारा माल, कमावलेलें कातडें, इ., मशीन. टूल्स आणि इक्विपमेंट इ.

आणि

खालील मालाच्या विक्रीस साहाय्य करतेः—

हातमागावरील कापड ( सुती व लोंकरी ), धातूचें सामान, चंदनी लांकूड, रोजवुड आणि हस्तिदंती आर्ट्स अँड क्रॅफ्टस्, रेशीम, जर, कातडीं व कातडी माल, खाद्य तेलें, लाकूड आणि कोळसा वगैरे.

## दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लि.

( शिड्यूल्ड बँक )

प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग
पुणें २.

| | |
|---|---|
| अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | रु. १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | रु. ७,१९,४८५ |
| खेळतें भांडवल | रु. ७५,००,००० |

मुंबई शाखाः—कॉमनवेल्थ बिल्डिंग, ८२, मेडोज स्ट्रीट, मुंबई १

श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. दा. ग. नापट, उपाध्यक्ष.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

श्री. गो. धों. जोगळेकर बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी., मॅनेजर.
श्री. सी. टी. चितळे मॅनेजिंग डायरेक्टर.

दळणाच्या चक्क्या—टूल ग्राइंडर्स
मशीन टूल्स
कुडबा कापण्याचीं यंत्रें—करवत मशीन्स.
या मालाबद्दल आमचेकडे चौकशी करण्यास विसरूं नका.
केळकर बंधू, लक्ष्मी रोड, पुणें शहर.

## विविध माहिती

**दिल्लीच्या गाडीला अधिक डबा—** मुंबई ते अमृतसरच्या दरम्यान धांवणाऱ्या अमृतसर एक्सप्रेसचा एक लष्करी डबा कमी करून त्याऐवजीं तिसऱ्या वर्गाचा एक अधिक डबा गाडीला जोडण्यांत येणार आहे. ह्या व्यवस्थेला लष्करी खात्यानें मान्यता दिल्यानें तिसऱ्या वर्गाची ही सोय होऊं शकली.

**मास्कोमधील व्यापारी वाटाघाटी—** सो. रशिआ, चीन आणि पूर्व युरोपमधील ६ राष्ट्रें ह्यांची एक व्यापारविषयक परिषद मास्कोला भरली होती. चीन, पूर्व जर्मनी, झेकोस्लोव्हाकिआ, पोलंड, हंगेरी, रुमानिआ व बल्गेरिआ ह्या राष्ट्रांचे प्रतिनिधी बोलणीं करण्यासाठी मास्कोला गेले होते.

**भारतीय बालकांसाठी तांदूळ—**भारतांतील २,७५,००० मुलांना सहा महिने पुरेल इतका तांदूळ देण्याचें संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या बालविभागानें एकमतानें ठरविलें आहे. ह्या तांदुळाची किंमत २,४०,००० डॉलर्स होईल. भारतांतील अन्नधान्याची टंचाई लक्षांत घेऊन निराश्रित मुलें व स्त्रिया ह्यांनाच हा तांदूळ मुख्यतः पुरविण्यांत येणार आहे. तांदूळ शक्य तितक्या लवकर पाठविण्यांत यावा अशा सूचनाहि देण्यांत आल्या आहेत.

**विमान प्रवासांतील सुरक्षितता—**पुढील महिन्यांत मॉन्ट्रीअल येथें नागरी विमानवहातुक परिषद भरणार आहे. विमान अपघातानें खालीं पडल्यास प्रवासी दगावण्याचा फार धोका असतो. तो कमी करण्यासाठी सव उतारूंनीं विमानाच्या शेपटीकडे तोंड करून बसावें अशी सूचना परिषदेंत ब्रिटनतर्फे करण्यांत येणार आहे. त्याशिवाय उतारूंना बसण्याच्या जागाहि अधिक बळकट करण्याची सूचना मांडण्यांत येणार आहे.

**संयुक्त प्रांतांत तागाचें उत्पादन—**मध्यवर्ती सरकारनें सूचना केल्याप्रमाणें संयुक्त प्रांत सरकारनें १ लाख एकर जमिनींत तागाची लागवड करण्याचें ठरविलें आहे. ही लागवड यशस्वी झाल्यास भारताच्या तागाच्या पुरवठ्यांत ८ लाख तागाच्या गांसड्यांची मोलाची भर पडेल. ज्या जमिनींत भाताचें पीक चांगलें येत नाहीं अशाच जमिनींतून तागाची लागवड करण्यांत येणार असल्यानें, अन्नधान्याखालील जमीन कमी होणार नाहीं.

**कोरियांतून बाहेर पडा—**कोरिआंतील युद्धासंबंधी अमेरिकन लोकांचें मत अजमावण्यांत आलें असतां प्रत्येक तीन अमेरिकन नागरिकांपैकीं दोघांनीं कोरियांतून अमेरिकन सैन्य काढून घेण्यांत यावें असें मत व्यक्त केलें. ६६ टक्के लोकांनीं सैन्य काढून घेण्याची सूचना केली, २५ टक्के लोकांनीं युद्ध चालू ठेवावें असें सुचविलें आणि ९ टक्के लोकांनीं मतच व्यक्त केलें नाहीं.

**कुबेर आणि भिकारी—** औंधच्या नबाबाचें घराणें एका काळीं कुबेरासारखें श्रीमंत होतें. हल्लीं मात्र त्या घराण्यांतील कित्येक वंशज सामान्य नागरिकांप्रमाणें काळ कंठीत आहेत. त्यापैकीं कांहीं जणांना तर सरकारकडून आतां दरमहा फक्त १ आणा पेन्शन मिळत आहे. ज्यांचें पेन्शन दरमहा एक रुपयापेक्षाही कमी आहे अशा वंशजांनी आपल्या पेन्शनची रक्कम काम्यूट करून पुढील सर्व पेन्शनाऐवजीं एक रक्कम रोख पत्करावी अशा सूचना उत्तर प्रदेश सरकारनें आतां दिल्या आहेत.

**मद्रास राज्यांत साखरेचे नवे कारखाने—**युद्धोत्तर पुनर्घटनेचा भाग म्हणून मद्रास राज्यांत दोन नवीन साखरेचे कारखाने काढण्याचा सरकारचा विचार चालू आहे. एक कारखाना पूर्व गोदावरी भागांत काढण्याचें घाटत आहे. ह्या कारखान्यांत रोज ६०० टन ऊंस गाळला जाईल. दुसरा कारखाना उत्तर अर्काटमध्यें चित्तूर भागांत निघणार आहे. ह्या कारखान्यांत रोज ४५० टन ऊंस गाळला जाईल. ज्या अनुभवी कंपन्यांना ह्या भागांत कारखाना काढण्याची इच्छा असेल, त्यांनीं मद्रास सरकारकडे अर्ज करावयाचे आहेत.

**बँकांच्या डायरेक्टरांचें वय—**ब्रिटनच्या वेस्ट मिनिस्टर बँकेच्या वार्षिक सभेंत ज्यांचीं सरासरी वयें ७५ वर्षें होतीं अशा ६ डायरेक्टरांचीं नांवें पुनर्निवडणुकीसाठी सुचविण्यांत आलीं होतीं व ते सर्व प्रचंड बहुमतानें निवडून आले. आतां त्यांचें सरासरी वय ७८ होईपर्यंत ते डायरेक्टर राहूं शकतील. ह्या डायरेक्टरांपैकीं सर्वांत वृद्ध असलेल्या डायरेक्टरांचें वय ८४ वर्षांचें आहे. सगळ्यांत कमी वय असलेला डायरेक्टर ७० वर्षांचा आहे. ब्रिटिश कंपनी कायद्याप्रमाणें कोणत्याहि डायरेक्टरला ७० वर्षें पुरीं झाल्यावर सेवानिवृत्त व्हावें लागतें. भागीदारांनीं पुन्हा निवडल्यास मात्र त्याला डायरेक्टराच्या जागेवर रहातां येतें.

**अमेरिकेकडील धान्याची किंमत—**भारतानें अमेरिकेकडे २० लक्ष टन अन्नधान्याची मागणी केली आहे. ह्या धान्यासाठीं द्यावी लागणारी किंमत भारतामधील धनाढ्य संस्थानिकांकडून घेण्यांत यावी अशी सूचना प्रतिनिधीगृहाचे एक सभासद मि. चार्लस कर्सटेन ह्यांनीं केली आहे. हैद्राबादचे निजाम जगांतील सर्वांत श्रीमंत गृहस्थ म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांची खाजगी मालमत्ता २०० कोटी डॉलर्सची आहे. भारतानें थोरिअम आणि रेडिअम सांपडणारी माती विकूनही अन्नधान्याची किंमत द्यावी, अशी सूचनाही मि. कर्सटेन ह्यांनीं केली आहे.

**टंक लेखनाची स्पर्धा—** कलकत्ता येथील ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ स्टेनोग्राफर्स ह्या संस्थेतर्फे टंक लेखनाची स्पर्धा नुकतीच भरविण्यांत आली होती. ह्या स्पर्धेत अकोला येथील एस. एन. निलाखे ह्यांनीं लागोपाठ चौथ्यांदा पहिला नंबर मिळविला. श्री. निलाखे ह्यांनीं मिनिटाला १०२·१ शब्द टंक लिखित केले. ह्यापूर्वीचा त्यांचाच उच्चांक १०१·८७ शब्दांचा आहे.

**इराकमध्यें आंतरराष्ट्रीय बँकेचें प्रतिनिधिमंडळ—** इंटरनॅशनल बँक फॉर रीकन्स्ट्रक्शन अँड डेव्हलप्मेंट ह्या संस्थेनें आपलें एक प्रतिनिधि मंडळ इराकला पाठविण्याचें ठरविलें आहे. मंडळाचा मुक्काम इराकमध्यें ३ महिने रहाणार आहे. ह्या मुदतींत इराकच्या आर्थिक व उत्पादनविषयक साधनांची पहाणी करण्याचा मंडळाचा विचार आहे.

—सर्व प्रांतांतील—
सुती-गरम-रेशमी
—खादीचें माहेरघर—
खादी मन्दिर
२६१, बुधवार पेठ
डमडेरे बोळाजवळ,
पुणें २.

# अर्थ

बुधवार, ता. ७ मार्च, १९५१





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## हिंद सरकारचें अंदाजपत्रक

( आंकडे कोटी रुपयांचे )

| | उत्पन्न | खर्च | तूट किंवा शिल्लक |
|---|---|---|---|
| १९५०–५१ (दुरुस्त अंदाज) | ३८७·२१ | ३७९·२८ | + ७·९३ |
| १९५१–५२ (चालू करांपासून) | ३६९·८९ | ३७५·४३ | – ५·५४ |
| १९५१–५२ (नवीन करवाढ विचारांत घेऊन) | ४०१·०४ | ३७५·४३ | + २५·६१ |

ता. २८ फेब्रुवारी रोजीं अर्थमंत्र्यांनीं आदर केलेल्या अंदाजपत्रकांतील मुख्य उत्पन्न व खर्च याबद्दलचे आकडे वर दिले आहेत. सुरवातीलाच १९५०–५१ च्या दुरुस्त अंदाजाचे आंकडे लक्षांत घेणें आवश्यक आहे. कारण या दुरुस्त अंदाजाप्रमाणें उत्पन्नाचा आंकडा मूळच्या अंदाजापेक्षां रु. ४८ कोटी ६२ लक्षांनीं वाढला आहे, व खर्चाचाहि आंकडा रु. ४१ कोटी ४० लक्षांनीं वाढल्यामुळें १९५०–५१ अखेर दुरुस्त आंकडे विचारांत घेऊन शिल्लक ७ कोटी ९३ लक्ष उरणार आहे. परंतु गेल्या वर्षी केलेल्या अंदाजाप्रमाणें शिल्लक फक्त रु. ७१ लक्षच राहाणार होती. १९५०–५१ साली दुरुस्त अंदाजाप्रमाणें एवढा फरक पडण्याचीं मुख्य कारणें म्हणजे जून १९५० पासून कोरियन युद्धामुळें निर्माण झालेल्या परिस्थितीमुळें हिंदच्या मालाचें गिऱ्हाईक वाढून कस्टमच्या उत्पन्नांतच प्रमुख वाढ रु. ३८ कोटी ७७ लक्षांची झाली, व त्याच्यांतच प्राप्तीवरील उत्पन्नाच्या वाढीची कांहीं कोटींची भर पडली, व रेल्वेकडूनहि अंदाजापेक्षां रु. ३९ लक्ष जास्त मिळाले. १९५०–५१ मध्यें उत्पन्नांत अपेक्षेबाहेर वाढ झाली. त्याप्रमाणें लष्करी खर्चांतहि रु. ११ कोटी ४५ लक्षांची वाढ झाली व इतर मुलकी खर्च रु. २९ कोटी ९५ लक्ष इतक्या रकमेनें वाढला. सारांश, १९५०–५१ अखेर गेल्या वर्षीच्या अंदाजाच्या मानानें वाढतें उत्पन्न व त्याच्या सहा सप्तमांश प्रमाणांत वाढता खर्च अशी परिस्थिति निर्माण होऊन अंदाजापेक्षां शिल्लकहि रु. ७ कोटी २२ लक्ष जास्त उरणार आहे. अवमूल्यनानंतर (सप्टेंबर १९४९) सुधारतें गेलेला निर्गत व्यापार व जुलै १९५० नंतर आंतरराष्ट्रीय परिस्थितीमुळें हिंदच्या मालाला अमेरिका–युरोपकडून आलेली जास्त मागणी याच गोष्टी मुख्यतः वाढत्या कस्टमच्या उत्पन्नाला कारण आहेत; वाढत जाणारें अंतर्गत उत्पादन नव्हे हें ध्यानांत ठेवलें पाहिजे. खर्चाच्या बाबतींतहि गेल्या वर्षांतील घटनामुळें लष्करी खर्च वाढला, व निर्वासितांच्या सुखसोई व अन्नधान्याच्या आयातीवरील वाढता खर्च यांमुळें खर्चाचेंहि प्रमाण वाढलें. वस्तूंचे बाजारभाव मर्यादित किंवा निदान स्थिर राखण्याचें सरकारचें निश्चयात्मक धोरण असतांहि ऑक्टोबर १९४९ मध्यें सर्वसामान्य किंमतींचा निर्देशांक ३९३·३ होता तो गेल्या महिन्यांत ४१४ पर्यंत आला आहे. या पार्श्वभूमीच्या दृष्टीनेंच १९५१–५२ चें अंदाजपत्रक विचारांत घेतलें पाहिजे.

सध्यां अस्तित्वांत असलेल्या नियमांप्रमाणेंच करयोजना असली तर १९५१–५२ सालीं एकंदर उत्पन्न रु. ३६९ कोटी ८९ लक्ष येईल परंतु खर्च रु. ३७५ कोटी ४३ लक्ष होणार असल्यामुळें शेवटीं रु. ५ कोटी ५४ लक्ष तूट येईल. आजच्या आर्थिक परिस्थितींत शिल्लक दाखविणारें अंदाजपत्रक सादर करण्याबद्दल अर्थमंत्र्यांचा कटाक्ष असल्यामुळें एकंदर रु. ३१ कोटी १५ लक्ष उत्पन्न जास्त येईल इतक्या किंमतीची करवाढ श्रमिंतांपासून गरिबांपर्यंत सर्वांवरच करण्यांत येणार आहे. एवढी मोठी प्रचंड, रु. ३१ कोटींहूनहि जास्त इतकी करवाढ करण्यांत येणार आहे ही एकच गोष्ट एकंदर परिस्थिति चिंतनीय आहे याची साक्ष पटविते, व विशेषतः १९५०–५१ वर्षी कस्टम इ. चें उत्पन्न जास्त कां आलें याच्या कारणांचा विचार करतां परिस्थितीचें चिंतनीय स्वरूप जास्तच स्पष्ट होतें. करवाढीच्या निरनिराळया नऊ योजना सुचविण्यांत आल्या आहेत; त्यांपैकीं दिल्ली शहरांत प्रथमच सुरू करण्यांत येणाऱ्या विक्रीकराबद्दल कोणालाहि आक्षेप घेण्यासारखें कांहींहि वाटणार नाहीं. या विक्रीकरामुळें रु. १ कोटी जमा होतील. कॉर्पोरेशन टॅक्स २॥ आण्यांपासून २॥। आणे करण्यांत येणार आहे. यामुळें रु. २॥ कोटींनीं उत्पन्न वाढेल. यांत आक्षेपार्ह कांहीं नसलें तरी विशेषतः भांडवलदारांनी ही करवाढ भांडवल–गुंतवणुकीवर प्रतिबंध घालील अशी तक्रार केली आहे. प्राप्तीवरील कर व सुपर टॅक्स यांवर पांच टक्के सरचार्ज लादण्यांत येऊन त्यामुळें रु. ६ कोटी इतक्या रकमेनें उत्पन्न वाढेल. आयात जकातींवर ५ टक्के करवाढ करून उत्पन्न रु. २ कोटींनीं वाढेल; हा वाढता कर मालाच्या वाढत जाणाऱ्या किंमती आणखी वाढवून महागाईंत भर घालील व कांहीं उद्योगधंद्यांच्या उत्पादनाच्या खर्चांत वाढ करील. भुइमुगाच्या निर्यातीवर टनामागें रु. ८० हा नवीन कर, मध्यम व हलकें कापड यांच्या किंमतीच्या १० टक्के निर्यात कर, व मिरी आणि कॉटन वेस्ट यांच्या निर्गतीवर कर यामुळें रु. ५॥। कोटींनीं उत्पन्न वाढेल. मोटार, पेट्रोल व रॉकेल यांच्या उत्पादनावरील करांत ५ टक्के वाढ करण्यांत येऊन उत्पन्न रु. १५ लक्षांनीं वाढेल. तंबाखू, तंबाखूपासून तयार करण्यांत येणाऱ्या विड्या व सिगारेट्स् व तपकीर यांवरील करवाढीमुळें रु. १३ कोटींचा कराचा वार्षिक बोजा अगदीं सामान्य जनतेवरच पडणार आहे. याप्रमाणें रु. ३१ कोटींवर वार्षिक करवाढ करून रु. २५ कोटी ६१ लक्ष एवढी शिल्लक दाखविणारें अंदाजपत्रक करण्यांत आलें आहे. १९४५ अखेर हिंदुस्थान सरकारची शिल्लक रु. ५२९ कोटी होती ती गेलीं पांच सहा वर्षे सतत घटत जाऊन १९५२ अखेर वरील करवाढ करूनहि सुमारें रु. ५३ कोटी एवढीच राहील, ही एकच गोष्ट आर्थिक परिस्थितीवर प्रकाश टाकण्यास पुरेशी आहे. तथापि, प्राप्त परिस्थितींत अर्थमंत्री, श्री. देशमुख यांनीं जी उपाययोजना सुचविली आहे, ती समाधानकारकच वाटेल अशी आहे.

## देशमुखांचें स्वागतार्ह अंदाजपत्रक

### निर्दोष आर्थिक मीमांसा व अनुरूप उपाययोजना

( लेखकः—प्रा. नी. वि. सोवनी, गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स अँड एकॉनॉमिक्स, पुणें. )

युद्धोत्तर कालांत, विशेषतः स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या कालांत, हिंदुस्थान सरकारचीं आजपर्यंतचीं अंदाजपत्रकें दोन अनिष्ट गृहीत प्रमेयावर दृष्टि ठेवून केलेलीं होतीं. ( १ ) भांडवली जमाखर्चांच्या अंदाजपत्रकांत कितीही मोठी तूट असली तरी त्यामुळें चलन-वृद्धीस पुष्टी मिळत नाहीं. ( २ ) उत्पादन वाढ–विशेषतः औद्योगिक–हा चलनवृद्धीवर एकच प्रभावी उपाय असल्यामुळें ती साधण्यासाठी उद्योगपती व भांडवलवाले यांच्यावर मुख्यतः बसणाऱ्या प्रत्यक्ष करांचें एकंदर प्रमाण कमी करून त्यास उत्पादन-वाढीसाठी विलोभनें पुरवावयाचीं. या दोन्ही अनिष्ट व चुकीच्या प्रमेयांमुळें यापूर्वीच्या अंदाजपत्रकांनीं चलनवृद्धीस कशी पुष्टी दिली याचें विवेचन "अर्था"च्या वाचकांसाठी पूर्वी केलेलेंच आहे. श्री. देशमुखांनीं परवा सादर केलेलें आपलें पाहिलें अंदाजपत्रक या दोन्ही आनिष्ट प्रमेयांपासून अलिप्त आहे. आर्थिक परिस्थितीचें निर्दोष निदान व समयज्ञता हे देशमुखांच्या अंदाजपत्रकाचे विशेष म्हणून सांगता येतील.

" करांच्या जमाखर्चांच्या अगर भांडवली जमाखर्चांच्या अंदाजपत्रकांतील तूट कर व कर्जें उभारून भरून काढण्यानें जनतेच्या हातीं पूर्वीपेक्षां अधिक चलन खेळूं लागतें व त्यामुळें चलनवृद्धि फोफावते. सरकारनें पूर्वी शिल्लक टाकलेल्या नगद शिलकींतून जरी ही तूट भरून काढली तरीहि तोच परिणाम होतो, यासाठीं चलनवृद्धीची परिस्थिति असतांना शक्यतर शिलकीचं अंदाजपत्रक करून जनतेच्या हातीं खेळत असलेलें मोकाट चलन सरकारी तिजोरीकडे खेचून घेण्याचा प्रयत्न करणें जरूरीचें आहे." हें श्री. देशमुखांच्याच शब्दांत त्यांच्या अंदाज-पत्रकाचें सूत्र आहे; आणि तें सर्वस्वी निर्दोष आहे. या सूत्राचें आकलन देशमुखांच्या पूर्वीच्या स्वतंत्र हिंदुस्थानांतील अर्थ-मंत्र्यांना झालेलें नव्हतें हें पुराव्यासह शाबीत करता येईल.

१९५१–५२ सालीं करांच्या जमाखर्चांच्या अंदाजपत्रकांत सध्याच्या करमानाप्रमाणें रु. ५·५४ कोटी व भांडवली जमा-खर्चांचे अंदाजपत्रकांत रु. ७८ कोटी इतकी तूट येईल असा अंदाज आहे. वर उल्लेखिलेल्या सूत्राप्रमाणें या एकंदर रु. ८३ कोटींच्या तुटीची भरपाई करवाढ करून अगर जादा कर्जें उभारून केली नाहीं तर त्यामुळें चलनवाढीस पुष्टी मिळेल. म्हणून त्यापैकीं बराचसा भाग करवाढ करून भरून काढण्या-साठीं देशमुखांनीं आपली करवाढीची योजना आंखली आहे. ही योजना आंखतांना त्यांनीं गेल्या ४–५ वर्षांत पूर्वीच्या अर्थ-मंत्र्यांनीं यासंबंधांत रूढ केलेली अनिष्ट प्रथा मोडून न्याय्य पण सांप्रतच्या परिस्थितीस अनुरूप अशीच करवाढ सुचविली आहे. त्यामुळें आर्थिक दृष्ट्या ती योग्य आणि प्रगतिपरच म्हणावी लागेल.

एकंदर रु. २१·१५ कोटींच्या नवीन करवाढीपैकीं जवळजवळ रु. १० कोटी धनिकवर्गांवर बसणाऱ्या प्रत्यक्ष करांची वाढ करून त्यांतून उगवायाचे आहेत. उरलेल्या करवाढीपैकीं निर्यात मालावर बसविलेल्या जकाती बहुतांशीं परदेशी गिऱ्हाइकांवरच बसणार आहेत. उरलेली करवाढ सामान्य जनतेवर, विशेषतः तंबाखूचें कोणत्या ना कोणत्या स्वरूपांत सेवन करणारावर, बसणार आहे. करवाढ ही केव्हांहि अप्रियच असते. तथापि, ती केलीच तर तिची विभागणी न्याय्य असावी हें तितकेंच खरें. श्रीमंतांवर पडणाऱ्या प्रत्यक्ष करांत सूट व गरिबांवर पडणाऱ्या अप्रत्यक्ष करांत वाढ ही देशमुखांच्या पूर्वीच्या अर्थमंत्र्यांची प्रथा लक्षांत आणली तर त्यांच्या नवीन करवाढीच्या योजनेंत देशमुखांनीं आपली न्यायबुद्धि वापरून नवीन करवाढ स्थूलमानानें सर्व वर्गांवर त्यांच्या आर्थिक कुवतीनुसारच विभागली आहे असें दिसून येईल.

पुढील वर्षी नाणेबाजारांतून रु १०० कोटी कर्जाच्या रूपानें उभारण्यांत यावयाचे आहेत. त्याच वर्षांत रु. ८७ कोटींच्या जुन्या कर्जांची परतफेडहि करण्यांत येणार आहे. म्हणजे सरकार वट कर्ज रु. १३ कोटींचेंच उभारणार व तें उभारणें सहज शक्य होईल असें वाटतें. कारण फेडावयाच्या रु. ८७ कोटी कर्जापैकीं जवळजवळ निम्मा भाग आजपर्यंत मध्यवर्ती बँकेन बाजारांतून वेळोवेळीं खरेदी करून ठेवलेलाच आहे. अल्प बचतीच्या योजनां-तून पुढील वर्षी रु. ४३ कोटी उभारण्यांत येतील.

नवीन करवाढ व कर्जउभारणी हिशोबांत घेऊन सुद्धां एकंदर अंदाजपत्रकांत रु. ५२·२७ कोटींची तूट राहते. ती नगदी शिलकेंतून मिटविण्यांत येणार आहे. त्यामुळें अर्थांतच चलनवृद्धीस पुष्टि मिळेल असें सकृद्दर्शनी वाटलें तरी इतर कांहीं अपेक्षित घटनांमुळें तसें न होण्याचा फार दाट संभव आहे.


# NOTICE

**THE BHARAT INDUSTRIAL BANK LTD., POONA.**

Notice is hereby given that the 13th Ordinary General Meeting of the Shareholders of the Bharat Industrial Bank Ltd., Poona will be held on Sunday, the 25th March, 1951 at Registered Office of the Bank, 15, Shukrawar Peth, Poona, at 5 p. m. to transact the following business.

1. To receive and consider the Report of the Directors, Audited balance sheet and Profit and Loss Account for the period ending 31st December 1950.

*2. To declare dividend.

3. To elect Directors in places of the retiring Directors who are eligible for re-election.

4. To appoint Auditors and fix up their remuneration.

5. To transact such other business as may be allowed by the Chairman.

By order of the Board,
**N. N. Kshirsagar.**
**R. B. Salvekar.**
*Managing Directors.*

*Poona, 3rd March 1951.*
*15, Shukrawar Peth, Poona 2.*

*N. B.*—The Transfer Books of the Bank will be closed from 16th March 1951 to 31st March 1951 both days inclusive.

* The dividend when sanctioned will be payable on and after 15th April 1951. The dividend warrants will be posted to the registered addresses of the Share-holders.

अमेरिकेकडून पुढील वर्षासाठा २० लक्ष टन धान्याची देणगी मिळण्याची आतां पुष्कळ अंशी खात्री देतां येईल. हें धान्य येथें विकून जवळ जवळ रु. ८०–९० कोटी हिंदुस्थान सरकारच्या हातीं येतील व ते शेतकीचें उत्पादन वाढविण्यासाठींच खर्च केले पाहिजेत अशी अमेरिकेनें अट घातली आहे. या पैशांतून भांडवली खर्चांपैकीं पुष्कळसा खर्च करतां येण्यासारखा आहे. हा पैसा अंदाजपत्रकांत जमेस धरण्यांत आलेला नाहीं व तो खर्च केल्यास त्यामुळें देशांतील प्रसृत: चलनांत भर पडणार नाहीं व म्हणून चलनवृद्धीस पुष्टीहि मिळणार नाहीं. एकंदर अंदाजपत्रकांतील तूट भरून काढण्यास त्याचा उपयोग होईल.

देशमुखांच्या अंदाजपत्रकाचें स्थूल स्वरूप असें आहे. त्यांतील मीमांसा व विचारसरणी प्राय: निर्दोष आहे. त्यामुळें चलनवाढीस पुष्टि मिळण्याचा फारसा संभव नाहीं, हें वर म्हटलेंच आहे. तथापि येथेंहि तारतम्य दृष्टि ठेवली पाहिजे. अंदाजपत्रक हा आर्थिक परिस्थितीचा महत्त्वाचा पण एकच भाग आहे. म्हणून चांगल्या अंदाजपत्रकानें पुष्कळसें कार्य झालें तरी सर्व कार्यभाग होईलच असें नाहीं. त्यासाठीं या अंदाजपत्रकांत अनस्यूत असलेल्या सूत्रांचा पाठपुरावा इतर आर्थिक क्षेत्रांतहि होणें आवश्यक आहे. त्याशिवाय या अंदाजपत्रकास पुरेसें यश प्राप्त होणार नाहीं. विशेषत: किमतींचें नियंत्रण व पदार्थांचें नियंत्रित वाटप याविषयीं कडक व अविचल धोरण ठेवणें आवश्यक आहे. देशमुखांना त्याची कल्पना आहे, व प्रस्तुतच्या आर्थिक परिस्थितीचें गांभीर्यहि त्यांना अज्ञात नाहीं. तेव्हां यासंबंधांत ते आपल्याकडून शक्य तो प्रयत्न करतील अशी अपेक्षा करण्यास हरकत नाहीं. प्राप्त परिस्थितीवर अप्रिय पण पथ्यकर उपाय योजण्यास ते कचरत नाहींत हें नुकतेंच त्यांनीं पाकिस्तानशीं व्यापारी करार करून व पाक रुपयाच्या हुंडणावळीच्या दरास मान्यता देऊन दाखविलें आहे.

वर म्हटल्याप्रमाणें अंदाजपत्रक म्हणजे सर्व नव्हे आणि देशमुखांच्या अंदाजपत्रकांत दोष काढतां येणार नाहींत असेंहि नाहीं. तथापि ते दोष चुकीच्या आर्थिक मीमांसेतून निर्माण झालेले नाहींत. ते सध्याच्या वेगानें बदलणाऱ्या बिकट परिस्थितींतून निर्माण झालेले आहेत. परिस्थितीवर मात करण्यासाठीं पूर्णपणें नाहीं तरी शक्य तितकें अनुरूप अंदाजपत्रक देशमुखांनीं केलें आहे. त्याबद्दल त्यांना दोष देणें अतिरंजितपणाचें ठरेल. 'दन्तभंगोहि नागानां श्लाघ्यो गिरिविदारणे' हाच न्याय त्यास लावला पाहिजे.

---

### " शाळाकरी विद्यार्थी व त्यांची हत्यारें " प्रदर्शन

रविवार, ता. ११ मार्च १९५१ रोजीं सकाळीं ९–३० वाजतां शाळाकरी विद्यार्थी व त्यांचीं हत्यारें या खास नवीन विषयावरील प्रदर्शनाचा जाहीर समारंभ मुंबई प्रांताचे गृहमंत्री, श्री. मोरारजी देसाई यांच्या हस्तें कॉमनवेल्थ विमा कंपनीच्या इमारतींत शेती व जंगल संग्रहालयाच्या दालनांत तळमजल्यावर होणार आहे. प्रदर्शन लॉर्ड रे महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालय, पुणें या संस्थेच्या विद्यमानें संस्थेच्या मुख्य ठिकाणीं मार्केट टॉवरवर मांडण्यांत आलें आहे. सर्व शाळांना व सर्व निमंत्रितांना प्रदर्शन मुक्तद्वार खुलें राहील.

मा. वि. घारपुरे
क्यूरेटर व चिटणीस.


## दी बँक ऑफ औंध, लिमिटेड.

मुख्य कचेरी:—१११–११२, सदाशिव पेठ, सातारा शहर.
शाखा:—औन्ध, आटपाडी, भवानीनगर व ओगलेवाडी.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.
मुदत ठेवी खालील दरानें स्वीकारल्या जातात.

१ वर्ष – द. सा. द. शें. २½ ४ वर्षे – द. सा. द. शें. ३½
२ " " " " " २¾
३ " " " " " ३ ५ " " " " " ४.

सातारा येथें सेव्हिंग बँक ठेवीवर द. द. शें. २ टक्के व्याज दिलें जातें. सेव्हिंग बँकेंत जास्तींत जास्त रु. १५,०००/– ठेव ठेवतां येते.

अधिक माहितीसाठीं लिहा अगर समक्ष भेटा.

वा. वा. घमंडे, सी. ए. आय्. आय्. बी., मॅनेजर.
न. गं. जोशी, बी. ए., एलएल्. बी., चेअरमन.


---

# NOTICE

## THE BHARAT INDUSTRIAL BANK LIMITED. POONA CITY.

Notice is hereby given that an Extra-Ordinary General Meeting of the share-holders of the Bharat Industrial Bank Ltd. will be held at the registered office of the Bank at 15 Shukrawar Peth, Poona City, on Sunday the 25th March, 1951, at 4–30 P. M. when the following resolution will be moved as special resolution :

Resolved that the following Articles be and are hereby amended as follows :—

A. Article 62—The whole of the Article 62 be deleted.

B. Article 67—Remove colon and put a full stop in its place after the word 'denomination' in the third line and delete the portion from "and" in the same line to the end of the article on page 12.

C. Article 89—Delete the present Article 89 (a) and substitute the following in its place as article 89 (a).

89 a—'upon show of hands or upon a poll every member holding one ordinary share or one preference share three months prior to the date of the General Meeting and qualified as hereinafter provided and who is present in person or by proxy shall have one vote for every Rs. 25 subscribed by him in the Capital of the company. However, the maximum number of votes to which any one share holder will be entitled will not exceed 5 per cent of the total voting rights of all the share-holders.'

D. Article 139 (20)—Delete Article 139 (20).

Poona
3-3-51.

By order of the Board.
R. B. Salvekar
N. N. Kshirsagar
Managing Directors.

### टेलिफोन कसा वापरावा ?

एका सुप्रसिद्ध ब्रिटिश कंपनीनें 'व्यापारांत टेलिफोन वापरण्याची मार्गदर्शिका' प्रसिद्ध केली आहे. ह्या कंपनीचें टेलिफोनचें वार्षिक बिल सुमारें ५०,००० पौंड आहे. बिलावरून कंपनीचें व्यापारांतील स्थान सहज लक्षांत येण्यासारखें आहे. ह्या विषयासंबंधीं मार्गदर्शिकेंत जीं अनुमानें काढण्यांत आलीं आहेत आणि ज्या सूचना केल्या आहेत, त्या सर्वच धंदेवाईक व्यापाऱ्यांनीं लक्षांत घेण्यासारख्या आहेत. टेलिफोनवर बोलणें सर्वच जणांना चांगलें साधत नाहीं. कांहीं लोक घाबरल्यासारखे बोलतात, कांहीं घाईनें बोलतात, कांहीं फार जलद बोलतात, कांहींजण बोलतांना आपलें तोंड फार लांब ठेवतात, तर कांहींजण चट्‌कन रागावतात, कांहीं गैरसमज करून घेतात, तर कांहींजणांना अपमान झाल्यासारखें उगाचच वाटतें. ह्या शेवटच्या प्रकारापैकीं बरेचजण अपरिचित आवाज वाटल्यास धसमुसळेपणानें बोलतात. ह्या लोकांना डॉ. जॉन्सनच्या शब्दांत मार्गदर्शिकेंत असा उपदेश करण्यांत आला आहे:—"प्रत्येक माणसानें आपल्या स्नेहभावाची सारखी दुरुस्ती करीत जावी." ज्यांना फार बोलायची संवय आहे त्यांना असें बजावण्यांत आलें आहे कीं त्यांचे शब्द भलत्याच माणसाच्या कानीं जाण्याची शक्यता आहे. कारण पुष्कळदां आवाज ओळखतां येत नाहीं. ज्या लोकांना टेलिफोनवर त्रासदायकपणें बोलण्याची संवय आहे असेच लोक टेलिफोन जास्त वापरतांना आढळून येतात असें मार्गदर्शिकेंत नमूद करण्यांत आलें आहे. टेलिफोन उचलल्या बरोबर 'हॅलो' म्हणण्याच्या पद्धतीबद्दल मात्र कांहींच लिहिलेलें नाहीं. आपल्याकडे प्रथम 'आपण येथून बोलत आहों' असें सांगण्याची पद्धत आहे. टेलिफोन वापरण्याची एक कला आहे. त्या दृष्टीनें वरील मार्गदर्शिकेचा उपयोग सहज समजण्यासारखा आहे.

---

### बॉंबे सेल्स टॅक्स कायद्यांत दुरुस्ती

भारतीय राज्यघटनेच्या २८६ व्या कलमानुसार राज्यसरकारांच्या अधिकारास मर्यादा घालण्यांत आल्यामुळें आणि कायद्याच्या अम्मलबजावणीबाबत आतांपर्यंत मिळालेला अनुभव जमेस धरून सेल्स टॅक्स ॲक्टामध्यें कांहीं विशिष्ट प्रकारच्या दुरुस्त्या करणें आवश्यक झालें आहे. अनेक प्रकरणांत असें आढळून आलें आहे कीं, केवळ विना–कर माल मिळावा म्हणून व्यापारी आपलीं नांवें रजिस्टर करतात आणि दुकानाची जागा बदलून कर चुकवितात. तेव्हां आतां यापुढें ज्यांचीं नांवें नोंदविण्यांत येतील अशा व्यापाऱ्यांना रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट मिळाल्याच्या तारखेपासून एक वर्ष पुर्ण होईपर्यंत विना–कर माल घेण्यास परवानगी दिली जाणार नाहीं.

---

### शेतमालाच्या विक्रीबाबतच्या नियमांत दुरुस्ती

१९४१ च्या बॉम्बे ॲग्रिकल्चरल प्रोड्यूस मार्केट्‌स रूल्समध्यें करण्यांत येणाऱ्या दुरुस्तीसंबंधीच्या मसुद्याबाबत मुंबई सरकारकडे पाठवावयाच्या हरकती व सूचना येत्या १ एप्रिलपर्यंत पाठवाव्या. सदरहु दुरुस्तीचा मसुदा मुंबई सरकारच्या ता. १५ फेब्रुवारीच्या गॅझेटच्या भाग ४ बमध्यें प्रसिद्ध झाला आहे. या दुरुस्तीनुसार एखाद्या मार्केट–कमिटीच्या निवडणुकीसाठीं उभ्या रहाणाऱ्या उमेदवारानें ५० रुपये अनामत ठेवले पाहिजेत.

---


# NOTICE.

**BHOR STATE BANK LIMITED, BHOR.**

Notice is hereby given that the Seventh Ordinary General Meeting of the Share-holders of the Bhor State Bank Ltd., will be held at 361-62 Budhwar Peth, Poona City on Wednesday the 21st Day of March, 1951 at 4-00 P. M. (S. T.) to transact the following business:—

(1) To receive and consider the Balance Sheet, the Profit and Loss Account and the reports of the Directors and Auditors for the year ended 31st December 1950.

(2) To accord sanction to a sum of Rs. 50/- appropriated to Reserve Fund by the Board.

(3) To declare a Dividend.

(4) To elect Directors in place of the retiring Directors who are eligible for re-election.

(5) To transact such other business as may be allowed by the Chairman.


By Order of the Board,

Bhor, 18th February 1951. R. G. Agashe, Manager.

*N. B.*:—The Share transfer books of the Bank will be closed from 16th March to 31st March, 1951 (both days inclusive.)

The Dividend, when declared, will be payable on and after Tuesday the 1st May, 1951. The Dividend warrants will be posted to the registered addresses of the Share holders. Change of address, if any, should immediately be communicated to the Bank.

**रोखीनें व हप्त्यानें विकत मिळतात.**




जुनी मशीन देऊन नवी घ्यावयाची असल्यास आम्ही बदली करून देतों.

**पेडणेकर आणि कं. लिमिटेड**

शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी, १७२ गिरगांव रोड, मुंबई ४.

तारेचा पत्ता:—PEDNECO, Bombay. फोन नं. २२७३८



## संयुक्तप्रांत सरकारचा शेतीचा कार्यक्रम

संयुक्त–प्रांत सरकारनें राज्यांतील शेतीच्या व्यवसायासंबंधीं एक पंचवार्षिक कार्यक्रम आंखला आहे. तो पूर्ण झाल्यावर राज्यांतील निम्मी अधिक जमीन भरभराटेल असा अंदाज आहे. ह्या कार्यक्रमाचे दोन भाग असून त्यापैकीं पहिला १९५१–५२ च्या फडणिशी वर्षांत अंमलांत येणार आहे. राज्यांत एकूण १,१०,००० खेडीं आहेत त्यापैकीं ५०,००० खेड्यांचा विकास येत्या पांच वर्षांत करण्यांत येईल. हें कार्य करण्यासाठी राज्यांतील चार खात्यांच्या नोकरांचें सहकार्य घेण्यांत येईल. शेतकी खातें, जनावरांचें खातें, उसाचें खातें आणि सहकारी चळवळ, यां ह्या चारी खात्यांचे अधिकारी एकोप्यानें काम करतील. १९५१-५२ सालीं १०,२५० खेडीं पुर्नघटनेसाठी हातीं घेण्यांत येतील. १९५२-५३ सालीं १७,७२०, १९५३-५४ सालीं २४,४५०, १९५४–५५ सालीं ३८,८०० आणि १९५५–५६ सालीं ५०,०००. ह्या ५०,००० खेड्यांचे गट करण्यांत येणार आहेत. प्रत्येक वर्षीं ह्या गटांतील खेड्यांची संख्या वाढविली जाईल, आणि अधिक मोठे गट तयार करण्यांत येतील. अशा तऱ्हेनें ४८ गट शेतीविषयक कामकाजासंबंधानें तयार होतील. १९५१–५२ साली प्रत्येक गटांत ५० खेडीं असतील. नंतरच्या वर्षीं अनुक्रमें ८०, १५० आणि १९५४–५५ सालीं २५० खेडीं असतील. १९५५–५६ सालीं प्रत्येक गटांतील खेड्यांची संख्या ३७५ होईल. शेती विषयक गटांप्रमाणेंच पाळीव जनावरांच्या पैदासीच्या दृष्टीनेंहि खेड्यांचे सात गट करण्यांत येणार आहेत. ह्या गटांतील खेड्यांची संख्याहीं ५० पासून वाढत वाढत ३७५ पर्यंत जाईल.

शेतीच्या शिक्षणाच्या दृष्टीनें खेड्यांचे पांच गट पाडण्यांत येणार आहेत. प्रत्येक गटांतील शिक्षणसंस्था प्रथम १०० खेड्यांतील लोकांना शिक्षण देतील पांचव्या वर्षाअखेर ५०० खेड्यांतील लोकांना शिक्षण देतील. उसाच्या पिकांच्या दृष्टीनें खेड्यांचे सहा गट पाडण्यांत आले आहेत. सध्यां ३,००० खेड्यांना त्यांचा उपयोग होतो. पांच वर्षाअखेर ७,५०० खेड्यांना ह्या गटांचा उपयोग होऊं लागेल प्रत्येक गटांतील उसाच्या लागवडीचें क्षेत्रही २,००० एकरांपासून ५,००० एकरांपर्यंत वाढेल. सध्यां सहकारी खात्यातर्फे ३००० खेड्यांना बीं-बियाणें पुरविलें जातें. पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीस १८,००० खेड्यांना पुरवठा करण्यांत येऊं लागेल. हल्लीं सहकारी स्टोअर्समध्यें फक्त ४०,००० मण बीं आहे. पण पुढील वर्षीं तें २ लाख मण असेल असा अंदाज आहे. १९५२–५३ सालीं सर्व राज्याला पुरेल इतकें म्हणजे, सुमारें १६ लाख मण शुद्ध बीं तयार होईल. सध्यां राज्यांत शुद्ध बीं सांठवून ठेवणारीं २१९ स्टोअर्स असून तीं शेतकी खात्यामार्फत चालविण्यांत येत आहेत. शेतीच्या सुधारणेच्या योजनेंत पुढील हेतूंचा अंतर्भाव करण्यांत आला आहे. पिकाच्या व जनावरांच्या सुधारणेविषयीं माहिती पुरवून शेतकऱ्यांची जिज्ञासा जागृत करणें, चांगलें बीं आणि अवजारें वापरणें व पाणीपुरवठ्याची सोय करणें, जमिनीचा मगदूर वाढवून दर एकरीं अधिक पीक काढणें, कीड, रोग आणि जंगली जनावरें ह्यांच्यापासून पिकांचें रक्षण करणें, पिकांच्या स्पर्धा लावणें, दुभत्या गाईच्या पैदाशीसाठी वळू पुरविणें, गुरांच्या रोगांना प्रतिबंध घालणें इ. जनावरांची पैदास, निगा व वाढ ह्यासंबंधींचें शिक्षण देऊन २४०० खेडुतांना तयार करण्यांत येणार आहे. शिकून तयार झालेलीं हीं माणसें चार चार खेड्यांचे गट करून त्यांतून वाटून देण्यांत येतील. संयुक्त-प्रांत सरकारनें आंखलेल्या पंचवार्षिक शेतीच्या कार्यक्रमाची रूपरेषा अशी आहे.

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक, लि.

(स्थापना १९१८)
बचतीच्या विविध योजना
हेड ऑफिस– गिरगांव, मुंबई.
शाखा : दादर, माहीम, बेळगांव

## भारतीय संसदेंत……

### साखरेचा प्रश्न सरकारचे हातांत राहिलेला नाहीं

" भारतांतील साखरेचें मुख्य उत्पादन पश्चिम उत्तर–प्रदेशांत होतें. तेथील साखर–कारखान्यांना इतरांकडून ऊंस विकत घ्यावा लागतो. प्रत्येक साखर–कारखान्यास ठराविक ऊंस लावून दिल्याखेरीज, किंवा तेथून कारखानेच हलविल्याखेरीज साखरेचा प्रश्न सुटणार नाहीं अशी माझी खात्री झाली आहे. तसें करणें भारी खर्चाचें आहे हें खरें. कारखान्यांना भरपूर ऊंस मिळाला तर १४ लक्ष टन साखर तयार होईल. पण प्रत्यक्ष उत्पादन १० लक्ष टन होतांनाहि पंचाईत पडत आहे.

" उत्तर प्रदेशांतील गूळवाले वजनदार आणि मोठे जबरदस्त आहेत. हे गूळवाले, खंडसरीवाले आणि इतर मंडळी साखर-कारखान्यांकडे ऊंस न जाऊं देण्याची कोशीस करीत असल्याचें मला माहीत आहे. गुळावर ते नियंत्रण घालूं देत नाहींत. या संसदेंतील उत्तर प्रदेशांतील सभासदांनीं देशाला साखर पुरवावयाची कीं जास्तींत जास्त गूळ करावयाचा याचा विचार करावा. साखर प्रश्न सरकारचे हातांत राहिलेला नाहीं ! "

—अन्नमंत्री

### तांदूळ खरेदी

१९५१ मध्यें सयामकडून ३ लक्ष टन तांदूळ खरेदी करण्याचा करार करण्यांत आला आहे.

### कापूस आणि कापड

देशी कापड गिरण्यांची गरज—३६ लक्ष गांठी कापूस.

१९४९–५० मध्यें प्रत्यक्ष पुरवठा—२८ लक्ष गांठी कापूस.

कापूस तुटीमुळें घटलेलें उत्पादन— { ३५ हजार गांठी कापड; १० हजार गांठी सूत }

संप, इत्यादि कारणांनीं घटलेलें उत्पादन— { १३८ हजार गांठी कापड; २८ हजार गांठी सूत }

१९४९–५० मध्यें इंग्लंडला रवाना— ३ कोटी वार कापड

१९४९–५० मध्यें इंग्लंडहून आयात—४ कोटी वार कापड

१९५० एप्रील–डिसेंबर इंग्लंडला रवाना—५ कोटी वार कापड

१९५० एप्रील–डिसेंबर इंग्लंडहून आयात—२२ लक्ष वार कापड

तलम कापड परदेशीं पाठवावयाला आतां बंदी करण्यांत आली आहे.

या सहा महिन्यांत परदेशीं पाठवावयाच्या मध्यम आणि जाड्याभरड्या कापडाकरितां १२ कोटी वार ही कमाल मर्यादा ठरविण्यांत आली आहे.

### मालवाहू बोटी

पुष्कळच बोटी बांधावयाच्या आहेत. सरकारजवळ पैसा नाहीं. बोटी बांधण्याच्या धंद्यांत परदेशी भांडवल नको असें ठरल्यानें इंग्लिश कंपन्यांचे सहकार्यानें नवीन कंपन्या काढण्याचा विचार सोडून देण्यांत आला आहे.

### प्रवासखर्च

१९५०–५१ मध्यें (फेब्रुवारी १८, १९५१) पर्यंत केंद्र मंत्र्यांचा एकूण प्रवासखर्च रु. १,१०,३११ झाला.

—संजय

### पाणीपुरवठ्यासाठी पंपाचें साहित्य

सध्यांच्या विकट अन्नपरिस्थितीला तोंड देण्याचा एक उपाय म्हणून मुंबई सरकारनें शेतकऱ्यांना अन्नपिकें, भाजीपाला, बटाटे व रताळीं यांची लागवड करण्यासाठी सोप्या अटींवर पाण्याचे पंप पुरविण्यासंबंधींची एक योजना तयार केली आहे. सदरहू पंपाचें साहित्य (म्हणजे डिझेल ऑइल इंजिन, सेंट्रिफ्युगल पंप, आवश्यक ते पाइप आणि जरूर असेल तेथें डिलिव्हर्स व ट्रॉली) शेतकऱ्यांना व त्यांच्या सहकारी संस्थांना हप्तेबंदीनें देण्यांत येईल. पंपासाठी येणारा खर्च त्यांच्याकडून पांच वर्षांत सारख्या हप्त्यांनीं वसूल करण्यांत येईल. शेतकऱ्यांच्या सहकारी संस्थांच्या बाबतींत त्यांच्याशीं विशिष्ट प्रकारचा करार करण्यांत येईल.

सरकार खालील चार प्रकारचीं इंजिनें पुरवील. स्कोडा १०।१५ व्हर्टिकल, ढाय हॅलसु ९ हॉरिझॉंटल, टॅंजी १२ व १५, क्रॉस्ले १० व १६, किंमती २,९५० रु. ते ९,६०० रु.

या योजनेनुसार वैयक्तिक शेतकऱ्यांना इंजिनें खरेदी करतां येतील व त्यांना स्वतःच्याच नव्हे तर शेजाऱ्यांच्या जमिनीलाहि पाणीपुरवठा करतां येईल. अशा बाबतींत जिल्ह्याच्या कलेक्टरांना, इंजिन खरेदी करणाऱ्या शेतकऱ्यांनीं पाणीपुरवठ्याबाबत इतरांना किती पैसे आकारावेत हें ठरवून देण्याचा अधिकार राहील. तसेंच अशा शेतकऱ्यांनीं कलेक्टर ठरवून देतील त्या प्रमाणांत जादा धान्यभरती करण्यास मान्यता दिली पाहिजे.

ज्यांना या योजनेचा फायदा घ्यावयाचा असेल त्यांनीं याबाबतींत तावडतोब आपल्या जिल्ह्याच्या कलेक्टरांशीं पत्रव्यवहार करावा. सरकारनें त्यांना इंजिन पाठविल्यापासून एक महिन्याच्या आंत त्यांनीं तें बसवून घेवून पाणीपुरवठ्यास सुरवात केली पाहिजे.

---

### महाराष्ट्र सहकारी विद्यालय, पुणें

सदर विद्यालयाच्या सातव्या शिक्षणक्रमाचा निकाल नुकताच जाहीर झाला आहे. वरील परीक्षेस बसलेल्या ५२ विद्यार्थ्यांपैकीं एकूण ४६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. त्यापैकीं पहिल्या वर्गांत ३, दुसऱ्या वर्गांत ३३ व तिसऱ्या वर्गांत १० विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. उत्तीर्ण विद्यार्थ्यांचें प्रमाण शें. ९० टक्के आहे. उत्तीर्ण विद्यार्थ्यांचीं नांवें खालील प्रमाणें आहेत.

**पहिला वर्ग—** भा. ज. गिते, मा. म. फाळके, ज. स. धनारसे.

**दुसरा वर्ग—** शं. ना. आहेर, बा. श्री. छत्रे, य. म. चितळे, रा. श्री. देशपांडे, प्रे. बा. देशपांडे, सि. अ. देशपांडे, ग. प. गोगटे, ल. स. जाधव, ग. भि. जोशी, ना. द. जोशी, मा बा. जोशी, शं. के. कारखानीस, घ. द्वा. कोळसे, श्री. म. खातू, वा. द. कुमठेकर, त्रिं. द. लोंढे, दि. बा. माने, ह. वा. नागणे, सिं. पा. नाठे, प्रे. ग. नाईक, बा. दे. पाटील, ग. लो. पाटील, गो. ल. पाटील, नि. द. पाटील, पं. वि. पाटील, शि. रा. पाटील, मा. गो. राठोड, म. वा. साळवेकर, सु. ना. साटम, सं. ना. साबळे, सु. बु. सराजिने, श्री. न. ठोके, ओं. ना. वाघ.

**तिसरा वर्ग—** बु. द. चौधरी, मु. म. इनामदार, म. स. जोशी, ग. भा. कोते, म. भि. कुलकर्णी, रा. प. लहामगे, क. मं. माळी, बा. गो. शेळके, बा. ना. वांगीकर, रा. फु. पाटील.

नेहमीप्रमाणें विद्यालयानें निकालाची उच्च परंपरा कायम राखली आहे. आजपर्यंतच्या सातहि डिप्लोमा परीक्षांच्या निकालाचें प्रमाण ८५% वर आहे, ही उल्लेखनीय बाब येथें नमूद करणें आवश्यक आहे.

**खराच्या किंमतीसंबंधी चौकशी—** कच्च्या खराच्या किंमती आणि खराच्या उद्योगधंद्यांना द्यावयाचें संरक्षण ह्यासंबंधीं टॅरिफ बोर्ड करीत असलेली चौकशी नुकतीच संपली. कच्च्या खराच्या उत्पादनाचा खर्च, भांडवलावरील योग्य नफा व संशोधन, इत्यादि बाबींसंबंधीं बोर्डानें चर्चा केली. ह्या धंद्याचा विकास करण्यासाठी एखादा खास फंड उभारण्यांत यावा किंवा काय आणि तो उभारण्यासाठीं कोणता मार्ग अनुसरावा ह्यासंबंधींहि विचार करण्यांत आला.

**भारतीय कोळशाच्या निर्यातीबद्दल तक्रार—** भारताच्या जैवळील कोळशाचा सांठा सुमारें ७० वर्षें पुरेल इतकाच आहे. असें असतांना इंग्लंडला भारतानें कोळसा पुरविण्याचें कबूल केल्याबद्दल असमाधान व्यक्त करण्यांत येत आहे. दरवर्षी ४ कोटी टन कोळसा भारताला लागतो. त्या हिशेबानें वरील अंदाज करण्यांत आला आहे. पाण्यावर उत्पन्न होणारी वीज भारतांत उपलब्ध होण्यासारखी असली, तरी ह्या शक्तीचा अद्याप पुरेसा विकास झाला नसल्यानें कोळशाचा सांठा जपून वापरावा अशा सूचना करण्यांत येत आहेत.

---


# NOTICE

## The Belgaum Bank Ltd. Belgaum.

Notice is hereby given that the Annual General Meeting of the Share-Holders of the Bank will be held on Tuesday the 20th March 1951 at the Registered Office of the Bank Viz. 'Balloli Building', Rawiwarpeth, Belgaum at 2 P. M. to transact the following business :—

(1) To receive & adopt the report of the Directors and Audited Statement of accounts for the year ended 31-12-1950. (2) To declare a Dividend. (3) To fill up the vacancies caused by the retirement of your Directors Viz.,

(1) Shri L. V. Deshpande. (2) Shri J. W. Kalaghatgi. (3) Shri G. N. Kulkarni. (4) Shri H. M. Jamadar.

The retiring Directors are eligible for re-election and they offer themselves for re-election. (4) To appoint Auditors and to fix their remuneration. (5) To do such other work as may be placed before the meeting with the permission of or by the Chairman.

By Order of the Board,
**G. V. SARAF,**
Chairman.

Belgaum,
6-2-1951.

Share-Holders desiring to ask any questions at the General meeting are requested to send them to the Chairman before 10th March 1951 for convenience.

The Transfer Books of the Company will be closed from 5th March 1951 to 20th March 1951 both days inclusive.

The Dividend when sanctioned will be paid on or after 26th March 1951. The Share-Holders are requested to communicate their change of address, if any.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.